**सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वाळवा तथा भूसंपादन अधिकारी राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 यांचे कार्यालय, इस्लामपूर**

-----------------------------------------------------------------------------------------------

**राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 कराड ते तासगाव कि.मी. 13/200 0 ते कि.मी. 25/500 मौजे. भवानीनगर ता.वाळवा जि. सांगली**

-----------------------------------------------------------------------------------------------

**सुधारित अंतिम भूसंपादन निवाडा**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा कायदा 48) कलम 3 G(1) अन्वये नुकसान भरपाई आदेश

भूसंपादन एसआर क्र. :- क्र.भूसं/निवाडा/रा.म.मा.क्र.266/एसआर- 22 /2018

मूल्यांकन दिनांक :- 05/07/2023

गावाचे नाव :- भवानीनगर

तालुका :- वाळवा

जिल्हा :- सांगली

# राष्ट्रीय महामार्ग क्र.266 तासगाव - कराड कि.मी. 13.200 ते कि.मी. 25.550 या रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भूसंपादन करणे मौजे - भवानीनगर ता. वाळवा जि.सांगली

---

क्रमांक/266/भूसं/एसआर-22 /2018
उपविभागीय अधिकारी कार्यालय,वाळवा
दिनांक:- 05/07/2023

## अंतिम भूसंपादन निवाडा-

**वाचाः-**

1. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(a) अन्वये सडक व परिवहन व राजमार्ग विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूकीची अधिसूचना, भारतीय राजपत्र असाधारण भाग II खंड 3, उपखंड (ii) सुधारीत अधिसूचना क्र.2715 का.आ./3103(अ) दिनांक- 22/09/2017
2. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण ईकाइ कोल्हापूर यांचे पत्र क्रं.NHAI/PIU /SLP/DPR-MIP/Gen/23011/16/1/2004 दि.29/09/2017 अन्वये भूसंपादन सांगली-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग क्रं.266 च्या चौपदरीकरणासाठी सांगली जिल्हयातील लांबी साठी सक्षम अधिकारी म्हणून नेमणूक झाले बाबत तसेच सदरील लांबीचे प्रारूप 3(a) अधिसूचना प्राप्त झाली आहे.
3. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकारण ईकाइ कोल्हापूर यांचे पत्र क्रं.NHAI/PIU/SLP/DPR-MIP/NA/23011/16/1/3157 दि.19/02/2019 अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चे 48) ने 3(A) अधिसूचना भारतीय राजपत्र असाधारण भाग II खंड 3, उपखंड (ii) अधिसूचना क्र.588 का.आ./657(अ) दिनांक- 28/02/2017 रोजी भारत सरकार नवी दिल्लीचे राजपत्रात प्रसिध्द झालेली अधिसूचना या कार्यालयास प्राप्त झाली आहे
4. कलम 3(A) ची अधिसूचना दैनिक पेपर पुढारी (मराठी) आवृत्तीमध्ये दिनांक 09/04/2019 व सकाळ (मराठी) आवृत्तीमध्ये दिनांक 09/04/2019 रोजी प्रसिध्द झाली आहे. व जनप्रवास (इंग्रजी) आवृत्तीमध्ये दिनांक. 4 /6/2019 रोजी प्रसिध्द झाली आहे
5. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकारण ईकाइ कोल्हापूर यांचे पत्र क्रं.NHAI/PIU/SLP/DPR-MIP/NA/23011/18/1/4523 दि.17/02/2018 अन्वये राष्टीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) ची अधिसूचना भारत सरकार, नवी दिल्लीचे राजपत्रात क्र.655 का.आ. 730(अ) दिनांक 14.02.2020 रोजी प्रसिध्द झालेली अधिसूचना या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

6. कलम 3(D) ची अधिसूचना दैनिक पेपर सकाळ (मराठी) आवृत्तीमध्ये दिनांक 17/06/2020 व दैनिक केसरी (मराठी) आवृत्तीमध्ये दिनांक 17/06/2020 रोजी प्रसिध्द झाली आहे.
7. उपअधिक्षक, भूमि अभिलेख इस्लामपूर यांचे कडील पत्र क्रं.जा.क्र.3062/भूमापन/भूसंपादन/ राष्ट्रीय महामार्ग/2019 दि.18.06.2019 ने भूसंपादन संयुक्त मोजणी अहवाल प्राप्त.
8. दुय्यम निबंधक श्रेणी-2, यांचेकडील पत्र जा.क्र.दु.नि.वाळवा/इस्लामपूर मुल्यांकन /जा.क्र.109/2020 दिनांक 3/07/2020 अन्वये खरेदी-विक्री व्यवहार व रेडीरेकनर प्राप्त
9. प्रकल्प संचालक भा.रा.रा.प्रा.प.का.ई. कोल्हापूर यांचेकडील पत्र क्रमांक NHAI/PIU/SLP/SS/2017-18 दि. 28/03/2018
10. इकडील अंतिम निवाडा क्र.भूस/निवाडा/राममाक्र/166/एसआर-12/2018 दिनांक 27/07/2018
11. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परिपत्रक क्रं.संकिर्ण-03/2018/प्र.क्र.43/अ-2 दि.13/08/2018
12. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागपत्र क्र.संकीर्ण/01/2018/प्र.क्र.07/अ-2 दिनांक 8/08/2018 व त्यासोबतचे दिनांक 2/07/2018 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
13. कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय यांचेकडील पत्र जा प्रशा.क्र.2590/2021 दिनांक 27/12/2021-

---

**प्रस्तावनाः-**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा 48) कलम 2 (2) खालील अधिसुचना क्र.279 का.आ./337/(अ) दिनांक 05/02/2014 व सुधारीत अधिसूचना क्र. 2510 का.आ./3244 दिनांक- 19/10/2016 अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.266 ची घोषणा करणेत आली आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 हा कराड ते तासगांव असा आहे. या राष्ट्रीय महामार्गावरील सांगली ते कोल्हापुर हा खंड प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण परियोजना कार्यान्वयन इकाई कोल्हापूर यांचे अंतर्गत मोडतो.

प्रस्तुत प्रकरणी संपादन संस्था, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग (रस्ते परीवहन व राजमार्ग मंत्रालय) हे प्राधिकरण असुन सदर प्राधिकरणाच्या वतीने प्रकल्प संचालक, परियोजना इकाई कोल्हापूर हे संबंधित अधिकारी आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 सांगली ते कोल्हापूर या महामार्गासाठी मोबदला निधी, न्यायालयीन खर्च तसेच तद्अनुषंगिक इतर सर्व खर्च देणेसाठी संपादन संस्था म्हणुन प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण परियोजना कार्यान्वयन इकाई कोल्हापूर यांचेवर बंधनकारक राहील.

**निवाडयाचे शिर्षक आणि भूसंपादन अधिनियमाखालील अधिसुचना तपशिल**

प्रस्तुत भूसंपादन निवाडा मौजे भवानीनगर ता.वाळवा जि.सांगली या गावातील राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 च्या क्षेत्रासाठी संपादन करावयाच्या जमीनीशी संबंधित आहे.

**कलम 3(a) खालील अधिसूचनाः-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 सांगली - कोल्हापूर कि.मी. 13.200 ते कि.मी. 25.550 या रस्त्याचे चौपदरीकरणासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन उपविभागीय अधिकारी वाळवा

यांची नेमणूक राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3 (a)अन्वये सडक व परीवहन व राजमार्ग विभाग भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडुन भारतीय राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा 48) कलम 2 (2) खालील अधिसुचना क्र.2715 का.आ./3103/(अ) दिनांक 22/09/2017

**1. सक्षम प्राधिकारी**

राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 सांगली - कोल्हापूर कि.मी. 13.200 ते कि.मी. 25.550 या लांबीसाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन उपविभागीय अधिकारी वाळवा यांची राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3 (a) अन्वये नेमणूक झालेली आहे.

**2. कलम 3(A) खालील अधिसूचनाः-**

कलम 3(a) खालील अधिसुचना क्र.279 का.आ.337(अ) दिनांक 05/02/2014 व सुधारीत अधिसूचना क्र.2715 का.आ./3103/(अ) दिनांक 22/09/2017 च्या अधिसुचनेनुसार नियुक्ती झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी, उपविभागीय अधिकारी वाळवा यांनी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(A) मधील तरतुदीनुसार भवानीनगर गावांसाठी प्रारुप अधिसुचना तयार करुन सादर केली होती. सदर 3(A) अधिसुचना भारत सरकार भारतीय राजपत्र असाधारण भाग II खंड 3, उपखंड (ii) अधिसूचना क्र.772 का.आ./896(अ) दिनांक- 18/02/2019 मध्ये प्रसिध्द करणेत आलेली आहे.

कलम 3(A) अधिसुचनेप्रमाणे मौजे भवानीनगर ता.वाळवा जि.सांगली संपादीत होणा-या जमीनीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**प्रपत्र - 1**

| अ.नं. | जिल्हा | तालूका | गाव | स.नं/ग.नं | जमिनीचा प्रकार | जमिनीचे स्वरुप | क्षेत्र चौ.मि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | सांगली | वाळवा | भवानीनगर | 184 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0090 |
| 2 | | | | 185 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0080 |
| 3 | | | | 183 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0285 |
| 4 | | | | 182 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0363 |
| | | | | 205 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0045 |
| 6 | | | | 216 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0032 |
| **एकुण एकंदर** | | | | | | | **0.0895** |

अधिनियमाचे कलम 3(A) 2 नुसार सदर अधिसूचना दोन स्थानिक वृत्तपत्रात 1) दैनिक पुढारी(मराठी) आवृत्तीमध्ये दिनांक 17/06/2019 व 2) सकाळ (मराठी) आवृत्तीमध्ये दिनांक 17/06/2019 3) जनप्रवास (इंग्रजी) दि.4/6/2019 रोजीच्या अंकात प्रसिध्द करण्यात येऊन प्रसिध्दी दिनांकापासुन 21 दिवसात हितसंबंधितांकडून आक्षेप मागविण्यात आले.

**2.(1) 3(C) नुसार चौकशी**

अधिसूचना क्र.772 का.आ.896 (अ) दिनांक 18/02/2019 अन्वये राजपत्रात प्रसिध्द झालेल्या मौजे भवानीनगर ता. वाळवा जि.सांगली या गावासाठी निवाडा तयार करण्यात येत आहे. कलम 3(A) अन्वये प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या जमिनीच्या संपादनाच्या अनुषंगाने अधिसुचना प्रसिध्द झालेपासुन 21 दिवसाचे आत आक्षेप मागविण्यात आले होते. त्याप्रमाणे मौजे भवानीनगर ता. वाळवा येथील संपादीत होणा-या जमीनी बाबत मुदतीत आक्षेप अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर आक्षेप अर्जावर खालील प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

**मुदतीत प्राप्त आक्षेप अर्जाचा तपशिल खालीलप्रमाणे (दिनांक 30/04/2019 पर्यंत प्राप्त)**

1. श्री. गणपतराव कृष्णा पाटील यांनी दिनांक 25.04.2019 रोजी अर्ज करुन मौजे-भवानीनगर येथील ग.नं. 205.223 मध्ये ही जमिन असून आमचे अशिल ग्रामीण भागात... अल्पभूधारक शेतकीर असल्याने त्याची जमीन अधिग्रहण करताना जमीन अधिग्रहण कायदा कलम 13 मधील दुरुस्त तरतूदीप्रमाणे चालू बाजारभवाप्रमाणे रक्कमेच्या 4 पट रक्कम अशी एकूण रक्कम मिळावी अशी विनंती केलेली आहे. तसेच सदरच्या नोटीसवर किती क्षेत्र संपादन करणार आहे याची सविस्तर माहिती मिळावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जांच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

2. श्री. राजेंद्र गणपतराव पाटील यांनी दिनांक 25.04.2019 रोजी अर्ज करुन मौजे-भवानीनगर येथील ग.नं. 224 मध्ये ही जमिन असून आमचे अशिल ग्रामीण भागात... अल्पभूधारक शेतकीर असल्याने त्याची जमीन अधिग्रहण करताना जमीन अधिग्रहण कायदा कलम १३ मधील दुरुस्त तरतूदीप्रमाणे चालू बाजारभवाप्रमाणे रक्कमेच्या ४ पट रक्कम अशी एकूण रक्कम मिळावी अशी विनंती केलेली आहे. तसेच सदरच्या नोटीसवर किती क्षेत्र संपादन करणार आहे याची सविस्तर माहिती मिळावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जांच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

3. श्री. तानाजी यशवंत चंद भवानीनगर यांनी दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन आमची ७/१२ असलेली जमीन भरवून दयावी.महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शी करुन २०१३ च्या भूमिअधिग्रहन कायदयाप्रमाणे योग्य ती नुकसान भरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जांच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी

घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

4. श्री. सुभाष मारुती गोडसे भवानीनगर यांनी दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन प्रत्यक्षात माझी जमीन महामार्गासाठी वापरली गेली असताना सुद्धा माझे नाव भूसंपादन प्रस्तावात नाही. आमची सात बारावर असलेली जमीन भरवून दयावी व महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शी करुन योग्य ती नुकसानभरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

5. श्री. सचिन जोतीराम गोडसे रा. भवानीनगर दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन प्रत्यक्षात माझी जमीन महामार्गासाठी वापरली गेली असताना सुद्धा माझे नाव भूसंपादन प्रस्तावात नाही. आमची सात बारावर असलेली जमीन भरवून दयावी व महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिंया संपूर्णपणे पारदर्शी करुन योग्य ती नुकसानभरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

6. श्री. हेमंतकुमार भिमराव पाटील रा. भवानीनगर दिनांक 25.04.2019 रोजी अर्ज करुन मौजे- भवानीनगर येथील ग.नं. 205.223 मध्ये ही जमिन असून आमचे अशिल ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकीर असल्याने त्याची जमीन अधिग्रहण करताना जमीन अधिग्रहण कायदा कलम १३ मधील दुरुस्त तरतूदीप्रमाणे चालू बाजारभवाप्रमाणे रक्कमेच्या ४ पट रक्कम अशी एकूण रक्कम मिळावी अशी विनंती केलेली आहे. तसेच सदरच्या नोटीसवर किती क्षेत्र संपादन करणार आहे याची सविस्तर माहिती मिळावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

7. श्री. विजय दौलू पाटील रा. भवानीनगर दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन प्रत्यक्षात माझी जमीन महामार्गासाठी वापरली गेली असताना सुद्धा माझे नाव भूसंपादन प्रस्तावात नाही. आमची सात बारावर असलेली जमीन भरवून दयावी व महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शी करून योग्य ती नुकसानभरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

८. श्री. शशिकांत पांडुरंग चंद रा. भवानीनगर दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन प्रत्यक्षात माझी जमीन महामार्गासाठी वापरली गेली असताना सुद्धा माझे नाव भूसंपादन प्रस्तावात नाही. आमची सात बारावर असलेली जमीन भरवून दयावी व महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शी करून योग्य ती नुकसानभरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

८. मानसिंग सिताराम मोहिते व इतर ६ रा. भवानीनगर आमचा गट नं. १२२ पेपरमध्ये आलेली नाही. मोजणी केलेनंतर असे निदर्शनास आले की ५ गुंठे क्षेत्र संपादन होत आहे. तरी योग्य तो न्याय मिळावा.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

९. श्री. अनिल दिनकर चंद भवानीनगर यांनी दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन आमची ७/१२ असलेली जमीन भरवून दयावी.महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शी करून २०१३ च्या भूमिअधिग्रहन कायदयाप्रमाणे योग्य ती नुकसान भरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

१०. . श्री. संभाजी दौलू मोहिते भवानीनगर यांनी दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन आमची ७/१२ असलेली जमीन भरवून दयावी.महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शी करुन २०१३ च्या भूमिअधिग्रहन कायदयाप्रमाणे योग्य ती नुकसान भरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जांच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जांवर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

११. . श्री. शामराव पांडुरंग पाटील भवानीनगर यांनी दिनांक. २६/४/२०१९ रोजी अर्ज देऊन आमची ७/१२ असलेली जमीन भरवून दयावी.महामार्गासाठी लागणारी जमिनीची संयुक्त मोजणी व भूसंपादन प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शी करुन २०१३ च्या भूमिअधिग्रहन कायदयाप्रमाणे योग्य ती नुकसान भरपाई आमच्या खात्यात जमा करावी. मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जांच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(C) अन्वये दिनांक 4/05/2019 रोजी सुनावणी घेण्यात येवुन हितसंबंधितांच्या आक्षेप अर्जांवर योग्य निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हरकत अर्ज निकाली ठेवणे येत आहे.

**मुदतीत नंतर प्राप्त आक्षेप अर्जांचा तपशिल खालीलप्रमाणे**

मुदतीत नंतर एक ही आक्षेप अर्ज प्राप्त झालेला नाही.

**3. संयुक्त मोजणी -**

संपादन संस्थेकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावानुसार व वेळोवेळी अर्जदार यांनी सादर केलेल्या तक्रारी अर्जांनुसार संपादन करणेत येणा-या जमिनीची संयुक्त मोजणी उपअधीक्षक भूमि अभिलेख वाळवा व संपादन संस्थेचे प्रतिनिधी यांनी संयुक्तरित्या केली आहे. त्यानुसार उपअधीक्षक भूमि अभिलेख वाळवा यांनी क्रं.जा.क्र. 3062/भूमापन/भूसंपादन/ राष्ट्रीय महामार्ग/2019 दि.14.08.2019 ने भूसंपादन संयुक्त मोजणी अहवाल प्राप्त. अन्वये मौजे भवानीनगर ता.वाळवा येथील संयुक्त मोजणी विवरणपत्र (JMC) व संयुक्त मोजणी नकाशा (JMP) या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. त्यानुसार सदरचे गट नंबर मधील क्षेत्र व त्यामध्ये असणा-या इतर बाबी संपादनात येत असल्याचे उपअधीक्षक भूमि अभिलेख वाळवा व संपादन संस्थेचे प्रतिनिधी यांनी प्रमाणित केलेले आहे. संयुक्त मोजणी अहवालानुसार संपादित होत असलेले स.नं./ग.नं. व त्यामधील क्षेत्राचा तपशिल खालील प्रमाणे प्रपत्र 2 मध्ये देणेत आलेला आहे.

## प्रपत्र 2

| अ. न | कलम 3A नुसार | | संयुक्त मोजणी अहवालानुसार संपादित होणारे क्षेत्र | | वगळलेले क्षेत्र | | कलम 3D अधिसुचनेत समाविष्ट/संपादना खालील क्षेत्र | | अतिरिक्त संपादित होणारे क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नं. | स.नं./ ग.नं. | चौ.मी | स.नं./ ग.नं. | चौ.मी | स.नं./ ग.नं. | चौ.मी | स.नं./ ग.नं. | चौ.मी | स.नं./ ग.नं. | चौ.मी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | 184 पै | 0.0090 | 184 पै | 0.250 | - | -- | 184 पै | 0.0090 | 184 | 0.0196 |
| 2 | 185 पै | 0.0080 | 185 पै | 0.300 | - | - | 185 पै | 0.0080 | 185 | 0.0050 |
| 3 | 183 पै | 0.0285 | 183 पै | 0250 | 183 | 0.0080 | 183 पै | 0.0250 | -- | -- |
| 4 | .182 पै | 0.0363 | 182 पै | 0.0050 | 182 | 0.0313 | 182 पै | 0.0050 | -- | -- |
| 5 | 205 पै | 0.0045 | 205 पै | 0.0030 | 205 | 0.0015 | 205 पै | 0.0030 | -- | -- |
| 6 | 216 पै | 0.0032 | 216 पै | 0.0030 | 216 | 0.0018 | 216 पै | 0.0030 | -- | -- |
| | | | | | | | | 0.0530 | | |

वरील तक्ता रकाना क्र. 11 मधील क्षेत्र 323 चौ.मी कलम 3 (A) अधिसूचनेतील प्रसिध्द झालेल्या क्षेत्राव्यतिरिक्त अतिरिक्त स्वरुपात संपादीत होत असलेने त्याकरिता कलम 3 (A) अधिसूचना स्वतंत्रपणे प्रसिध्द करुन भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

**4. कलम 3(D) खालील अधिसूचनाः-**

वरील परिच्छेद क्रं. 3 मध्ये दर्शविलेप्रमाणे प्रपत्र - 2 मधील रकाना क्रं. 9 मध्ये नमद केलेले क्षेत्र 960 चौ.मी बाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियमाचे कलम 3 (D) नुसार अधिसूचना तयार करून प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग क्रं.166 परियोजना कार्यान्वयन ईकाइ कोल्हापूर यांच्यामार्फत उपसचिव, रस्ते परिवहन व राजमार्ग विभाग, भारत सरकार यांच्याकडे पाठविण्यात आली. त्यास केंद्र शासन, रस्ते व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मौजे भवानीनगर ता.वाळवा जि.सांगली येथील राष्ट्रीय महामार्ग क्रं. 266 चे चौपदरीकरणासाठी संपादित होणाऱ्या जमिनीबाबतच्या अधिसूचनेस मान्यता देवून सदर अधिसूचना राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3 (D) खालील रस्ते व परिवहन राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार असाधारण राजपत्र भाग II खंड 3 उपखंड (ii) मधील अधिसुचना क्र.665 का.आ.730(अ) दिनांक 14.02.2020 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) भारत सरकार असाधारण राजपत्र भाग II खंड 3 उपखंड (ii)

अधिसुचना क्र.665 का.आ.730(अ) दिनांक 14.02.2020

ब) दैनिक सकाळ (मराठी) आवृत्तीमध्ये - दिनांक 17.06.2020

क) दैनिक केसरी (मराठी) आवृत्तीमध्ये- दिनांक 17.06.2020

प्रपत्र - 3

| अ.नं. | जिल्हा | तालुका | गाव | सर्वे नं/गट नं. | | जमिनीचा प्रकार | जमिनीचे स्वरुप | 3D जमिनीचे क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 3(A) प्रमाणे | मोजणी अहवाला-प्रमाणे | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | |
| 1 | सांगली | वाळवा | | 184 पै | 184 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0090 |
| 2 | | | | 185 पै | 185 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0080 |
| 3 | | | | 183 पै | 183 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0250 |
| 4 | | | | 182 पै | 182 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0050 |
| 5 | | | | 205 पै | 205 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0030 |
| 6 | | | | 216 पै | 216 पै | खाजगी | जिरायत+बागायत | 0.0030 |

**4.(1) <u>कलम 3 (G) नुसार नोटीस व चौकशी</u> :-**

राष्ट्रीय महामार्ग क्रं.266 सांगली - कोल्हापूर कि.मी. 13.200 ते कि.मी. 25.550 या रस्त्याची राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) अन्वये अंतिम अधिसूचना राजपत्रात दिनांक 14.02.2020 रोजी प्रसिध्द झाल्यानंतर ती दैनिक पुढारी व दैनिक जनप्रवास आवृत्तीमध्ये दिनांक 17/06/2020 रोजी प्रसिध्द करणेत आली. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) अन्वये जाहीर प्रसिध्दी दैनिक सकाळ व दैनिक केसरी दिनांक 17.06.2020 रोजीचे वृत्तपत्रात देवुन भूसंपादन क्षेत्राबाबत हितसंबंधितांकडुन आक्षेप मागविणेत आलेले होते. त्याअनुषंगाने एकही आक्षेप अर्ज मुदतीत प्राप्त झालेला नाही तसेच आक्षेप अर्ज मुदतबाहयही प्राप्त झालेले नाहीत. तथापी 3(D) अन्वये अंतिम अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द होण्यापूर्वी 5 तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहेत.

1. दि. 6/07/2020 रोजी श्री.हेमंतकुमार भिमराव पाटील व बाबासो भिमराव पाटील यांनी अर्ज देवून ग.नं. 184 मधील आमची जमीन संपादन होत असून जी नोटीस प्रसिद्ध केली त्यामध्ये आमचे रस्त्यासाठी किती क्षेत्र संपादन होणार हे कळून येत नाही तसेच सदरचे क्षेत्र संपादन झालेनंतर उर्वरीत क्षेत्र उल्प रहाते.

2. दि. 6/07/2020 रोजी श्री. शामराव पांडुरंग पाटील रा. भवानीनगर यांनी अर्ज देवून ग.नं. 183 अ व ब मधील आमची जमीन संपादन होत असून जे क्षेत्र संपादन होणार आहे ते अल्प आहे. तसेच सदरचे क्षेत्र संपादन झालेनंतर उर्वरीत क्षेत्र उल्प रहाते.

3. दि. 6/07/2020 रोजी श्री.हेमंतकुमार भिमराव पाटील व बाबासो भिमराव पाटील यांनी अर्ज देवून ग.नं.

657 मधील आमची जमीन संपादन होत असून जी नोटीस प्रसिद्ध केली त्यामध्ये आमचे रस्त्यासाठी किती क्षेत्र संपादन होणार हे कळून येत नाही तसेच सदरचे क्षेत्र संपादन झालेनंतर उर्वरीत क्षेत्र उल्प रहाते.

4. . दि. 6/07/2020 रोजी श्री. सुनिल शिवाजी सावंत यांनी अर्ज देवून ग.नं. 181 मधील आमची जमीन संपादन होत असून जी नोटीस प्रसिद्ध केली त्यामध्ये कोणाचे किती क्षेत्र संपादन होत आहे हे नोटीसीत नमूद नाही.मी रस्त्यालगत असलेमुळे माझी जमीन रस्ता संपादनासाठी जात आहे. मी अत्यल्प् भूधारक होत आहे.

5. श्री. मानसिंग सिताराम मोहिते भवानीनगर येथील गट नं. 10/2/ब ही जमीन असून माझी जमीन रस्त्याला लागून असून त्या जमीनीमधील काही क्षेत्र रस्ता संपादनासाठी जात आहे. मला एवढीच जमीन आहे दुसरीकडे जमीन नाही.

**जमिनीची वर्गवारी खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.**

| अ.नं. | जमिन महसूलाचे आकारणी प्रति हेक्टर रुपये | महसूल आकारानुसार येणारी वर्गवारी |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | 0 ते 1.25 | I |
| 2 | 1.26 ते 2.50 | II |
| 3 | 2.51 ते 5.00 | III |
| 4 | 5.01 ते 7.50 | IV |
| 5 | 7.51 ते 10.00 | V |
| 6 | 10.01 ते 12.50 | VI |
| 7 | 12.51 ते च्या पुढे | VII |

जमीन महसुल आकारणी नुसार मौजे भवानीनगर ता. वाळवा जि.सांगली येथील संपादीत होणा-या जमीनी खालील प्रमाणे वर्गीकृत होतात.

**प्रपत्र - 4**

| अ.नं. | स.नं/ग.नं | 7/12 प्रमाणे एकुण क्षेत्र हे.आर | एकुण आकार | प्रति हे.आकार | आकारणी नुसार ग्रुप | संपादना खालील एकुण क्षेत्र चौ.मी | दिनांक 05/05/22 चे निवाडयात घेणेत आलेले क्षेत्र | त्यापैकी उर्वरित संपादित क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | 184 पै | 0.58 | 5.10 | 8.79 | 5 | 0.0090 | 0.0009 | 0.0081 |
| 2 | 185 पै | 0.59 | 4.32 | 7.32 | 4 | 0.0080 | 0.0008 | 0.0072 |
| 3 | 183 पै | 0.71<br>पो.ख 0.02 | 6.72 | 9.20 | 5 | 0.0250 | 0.0025 | 0.0225 |
| 4 | 182 पै | 0.13<br>पो.ख 0.01 | 1.44 | 10.28 | 6 | 0.0050 | 0.0005 | 0.0045 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 205 पै | 0.94 पो.ख 0.04 | 10.37 | 10.58 | 6 | 0.0030 | 0.0003 | 0.0027 |
| 6 | 216 पै | 0.60 पो. ख 0.08 | 6.47 | 9.51 | 5 | 0.0030 | 0.0003 | 0.0027 |

**5. नुकसान भरपाईची निश्चिती :-**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(A) खालील अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपुर्वीचे जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार विचारात घ्यावे अशी तरतुद असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कलम 3(A) ची अधिसुचना दिनांक 18.02.2019 रोजी प्रसिध्द झाली आहे. त्यामुळे दि.18.02.2016 ते 18.02.2019 या कालावधीमध्ये झालेले खरेदी-विक्री व्यवहार विचारात घेण्यात आले आहेत. तसेच जमिनीचे बाजारमूल्य ठरवितांना भूसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 च्या कलम 26 नुसार तीन प्रकारच्या निकषांवर आधारित मूल्य निश्चित करावयाचे असून या निकषांनुसार येणारे सर्वाधिक मूल्य निर्धारित करावयाचे आहे.

**6.(अ) खरेदी विक्री व्यवहाराच्या आधारे येणारे मूल्यांकन :-**

मौजे भवानीनगर ता. वाळवा जि.सांगली येथील सन 2017-2018 चे शीघ्रसिद्ध गणक दराचे अवलोकन केले असता मौजे भवानीनगर हे गाव राज्य महामार्ग क्र.3 या महामार्गालगत असून हे गाव विभाग क्रं. 2 मध्ये समाविष्ठ आहे. मौजे भवानीनगर गावासाठी मुद्रांक अधिनियम 1899 तसेच महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतिचे खरे बाजारमुल्य निश्चित करणे) नियम 1995 मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेले मुख्य नियंत्रक महसुल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य, पुणे अन्वये तयार केलेले सन 2017-2018 चे वार्षिक मुल्यदर तक्ता (परिशिष्ट ब) आणि त्या संलग्न असलेल्या मुल्यांकन करताना अमंलात आणावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना परिशिष्ट सन 2017-2018 वार्षिक मूल्यदर विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक दि.02/05/2006 मधील निर्देशानुसार बाजारमूल्य दर तक्त्यामध्ये हंगामी बागायत अथवा बारमाही बागायत जमिनीसाठी दर दिलेले नसल्यास जिरायत शेतजमीनीच्या मूल्यदरावरून हंगामी बागायतीसाठी दीड पट आणि बारमाही बागायतीसाठी दुप्पट असे मूल्य विचारात घेणे बाबत सूचना आहेत. संपादित होणा-या जमिनीचे मुल्यांकन खरेदी-विक्री व्यवहारा आधारे खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

प्रकरणात कलम 3(A) खालील अंतिम अधिसुचना दिनांक 18/02/2019 रोजी प्रसिध्द झाली असल्यामुळे या दिनांकापुर्वीचे म्हणजेच दि.18.02.2016 ते 18.02.2019 या कालावधीमध्ये झालेले खरेदी विक्री व्यवहाराची माहिती दुय्यम निबंधक वाळवा इस्लामपूर यांचेकडून मागवण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

## 2014 ते 2017 अखेर खरेदी विक्री व्यवहार तक्ता

### प्रपत्र 5

| अ क्र | सर्वे नं गट नं | गटाचे पूर्ण क्षेत्र हे. आर. | गटाचा पुर्ण आकार रु पै | गटाचा प्रति हेक्टरी आकार रु पै | विक्री क्षेत्र हे.आर. | विक्रीची किंमत रु पै | विक्री झालेल्या जमिनीचे प्रति हेक्टरी मूल्य रु पै | विक्री झालेल्या जमिनीचे प्रति चौमी मूल्य रु पै | दस्त क्रमांक | दस्त दिनांक | ग्रुप क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

मौजे भवानीनगर  ता. वाळवा येथील संपादीत होणा-या जमीनी हया सर्वसाधारणपणे ग्रुप क्र. I,IV,V,VI च्या आहेत. त्यामुळे संपादनाखालील जमीनीचे मुल्यांकन करण्यासाठी वरील प्रपत्रामध्ये समाविष्ठ खरेदी विक्री व्यवहारापैकी फक्त ग्रुप क्र. I गटातीलच खरेदी विक्री व्यवहार विचारात घ्यावे लागतील.

दुय्यम निबंधक यांचेकडून भवानीनगर या गावातील मागील तीन वर्षातील एकही व्यवहार प्राप्त झालेला नाही.

**(ब) शीघ्रसिद्ध गणक तक्त्याप्रमाणे निश्चित करावयाचे बाजारमूल्य**

प्रस्तुत भूसंपादन मौजे भवानीनगर  ता. वाळवा या गावातील असुन सदर गाव ग्रामीण विभागात मोडते. महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निश्चित करणे) नियम 1995 मधील तरतुदीनुसार वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्यात येतात. वार्षिक मूल्यदर तक्त्यासोबत मूल्यांकनासाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक निरीक्षक यांनी परिशिष्ट अ मध्ये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्या मूल्यदर तक्त्याचा एक भाग आहे. कलम 3(A) ची अधिसूचना प्रसिध्दी वर्ष 2019 मधील असल्यामुळे सन 2017-2018 चे शिघ्रसिद्ध गणक दरात हायवे वरील मिळकती साठी रु.1250/- प्रति चौ.मी. दर दिला आहे.

प्रस्तुत प्रकरणात 3(A) अधिसूचना दि.18.02.2019 रोजी प्रसिध्द झाली आहे. तो मूल्यांकनाचा दिनांक निर्धारित करण्यात आला असल्यामुळे सन 2017 च्या प्रसिध्द बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणारे दर संपादित जागेचे मूल्यांकन कामी विचारात घेणे आवश्यक आहे. दुय्यम निबंधक वाळवा यांचेकडून प्रसिध्द बाजारमूल्य दर तक्ता 2017-2018 नुसार मौजे भवानीनगर  ता. वाळवा जि.सांगली हे गाव विभाग क्र. 3 मध्ये मोडत असुन येथील ग्रामीण क्षेत्रातील संपादित जागेचे जिरायत शेत जमिनीचे दर खाली नमुद केल्यानुसार आहेत.

## जिरायत शेतजमिनीचा प्रति हेक्टर/ चौ.मी. दर

| अ.नं. | दस्तसंच | दर |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | 0.00 ते 1.25 | प्रति हेक्टर दर 462500 |
| 2 | 1.26 ते 2.50 | प्रति हेक्टर दर 539000 |
| 3 | 2.51 ते 5.00 | प्रति हेक्टर दर 616000 |
| 4 | 5.01 ते 7.50 | प्रति हेक्टर दर 785000 |
| 5 | 7.51 ते 10.00 | प्रति हेक्टर दर 887500 |
| 6 | 10.01 ते 12.50 | प्रति हेक्टर दर 1062000 |
| 7 | 12.51 ते च्या पुढे | प्रति हेक्टर दर 1134000 |
| 8 | बिनशेती जमिनीचा दर | प्रति चौ. मी. दर 1130 |
| 9 | हायवे लगत जमिनीचा दर | प्रति चौ. मी. दर - 1250 |
| 10 | गावठाणातील मिळकती | प्रति चौ. मी. दर - 1360 |

❖ तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ग्रुप.क्र. | खरेदी विक्री व्यवहारानुसार येणारे बाजारमुल्य प्रति चौ.मी (रुपयांत) | | | जमीनीच्या शिघ्रसिध्द गणका आधारे येणारे बाजारमुल्य प्रति चौ.मी (रुपये) | | | उच्चतम दर असलेले बाजारमुल्य प्रति चौ.मी (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जिरायत प्रति चौ.मी (रुपयात) | हंगामी बागायत प्रति चौ.मी (रुपयात) | बागायत प्रति चौ.मी (रुपयात) | जिरायत प्रति चौ.मी | बिगरशेती प्रति चौ.मी | हायवे वरील जमीनीचे दर प्रति चौ.मी (रुपयांत) | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | I | -- | --- | -- | 46 | 1130 | 1250 | 1250 |
| 2 | IV | -- | --- | -- | 78 | 1130 | 1250 | 1250 |
| 3 | V | -- | --- | -- | 88 | 1130 | 1250 | 1250 |
| 4 | VI | -- | --- | -- | 106 | 1130 | 1250 | 1250 |

❖ बागायत जमिनीचा मुल्यांकनाचा **तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.**

| अ.नं. | ग्रुप.क्र. | खरेदी विक्री व्यवहारानुसार येणारे बाजारमुल्य प्रति चौ.मी (रुपयांत) | जमीनीच्या शिघ्रसिध्द गणका आधारे येणारे बाजारमुल्य प्रति | उच्चतम दर असलेले |
|---|---|---|---|---|

| | | | | | चौ.मी (रुपये) | | | बाजारमुल्य प्रति चौ.मी (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जिरायत प्रति चौ.मी (रुपयात) | हंगामी बागायत प्रति चौ.मी (रुपयात) | बागायत प्रति चौ.मी (रुपयात) | बागायत प्रति चौ.मी | बिगरशेती प्रति चौ.मी | हायवे वरील जमीनीचे दर प्रति चौ.मी (रुपयांत) | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | I | -- | --- | -- | 92 | 1130 | 1250 | 1250 |
| 2 | IV | -- | --- | -- | 156 | 1130 | 1250 | 1250 |
| 3 | V | -- | --- | -- | 176 | 1130 | 1250 | 1250 |
| 4 | VI | -- | --- | -- | 212 | 1130 | 1250 | 1250 |

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परिपत्रक क्रं.संकिर्ण-03/2018/प्र.क्र.43/अ-2 दि.13/08/2018 अन्वये विविध प्रकल्पसाठी सार्वजनिक प्रयोजनाकरीता संपादित करण्यात येणा-या जमिनीसाठी मोबदला निश्चित करताना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करणेत यावा अश्या सुचना आहेत.

" भूसंपादन प्रकरणात मोबदल्याच्या रकमेची परिगणना महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम,1958 च्या कलम 69 अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम,1995 नुसार निर्गमित केवळ वार्षिक बाजारमूल्य दराचा आधार घेऊन करण्यात यावी." अशा शासनाने सुचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून खालीलप्रमाणे प्रपत्र 6 मध्ये प्रति चौ. दर विचारात घेवुन संपादित होणाऱ्या जमिनीचे खातेदारनिहाय मूल्यांकन निश्चित करण्यात आलेले आहे.

जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार व शिघ्रसिद्धगणकाचे दर यावरून जमिनीचे बाजारमूल्य ठरवितांना भूसंपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 कलम 26 नुसार वरील मूल्यांकनापैकी सर्वाधिक येणारा बाजारमूल्य दर निश्चित करणेकरिता मागील तीन वर्षाचे सरासरी खरेदी विक्री व्यवहार व सन 2017-2018 मधील शिघ्रसिद्ध गणकाचा दर याची तुलना केली असता संपादित जमीन ही हायवे लगत व हायवेसाठी संपादित होत आहे. हायवे लगत जमिनीचा दर शिघ्रसिद्ध गणका नुसार 1070/- प्रति चौ.मी. हा दर खरेदी विक्री व्यवहार, जिरायत शेतजमिनीचा शिघ्रसिद्ध गणका नुसार तसेच बिनशेती जमिनीचा दर यापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. संपादित होणाऱ्या जमिनी हायवे लगत असल्याने हायवे लगतचे दर विचारात घेवून निवाड्यामध्ये दर्शविले आहेत. संपादित होणारी जमीन हायवेसन्मुख जमीन असल्यामुळे मा.शासनाच्या दि.13/08/2018 रोजीच्या परिपत्रकान्वये शिघ्रसिध्द गणकानुसार देय प्रति चौ.मी.1070/-रु मुल्यांकन दर निर्धारित करणेत येत आहे.

**7. जमिनीचे गुणांकाधारित बाजारमुल्य :-**

भूसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 च्या कलम 26 (2) नुसार गुणाकार घटक महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 अ महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई अधिसुचना क्रं.एलक्युएन12/ 2013/प्र.क्र.190/अ-2 दिनांक 26/05/2015 या अधिसूचनेनुसार व महाराष्ट्र शासन महसुल व वनविभागाची अधिसुचना क्र.एलक्युएन12/2013/प्र.क्र.190/अ-2 दिनांक.24/04/2017 अन्वये भूसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 मधील पहिल्या अनुसुचित सुधारणा करण्यात आलेले आहे त्यानुसार कृषि व नगरविकास क्षेत्रासाठी गुणांक 2.00 असा घेण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. सदर अधिसूचनेनुसार मौजे भवानीनगर ता. वाळवा जि. सांगली हे गाव ग्रामीण भागातील असल्यामुळे या गावातील जमिनीचे मुल्यांकनासाठी 2.00 गुणांक निश्चित करण्यात आला आहे.

**8. जमीनीची मालकी :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. 266 सांगली - सोलापुर कि.मी 13.200 ते कि.मी. 25.500 साठीचे प्रस्तुत भूसंपादन प्रस्तावातील संपादनाखालील जमीनीची मालकी संबंधित गावचे भू-हक्क अभिलेख (7/12) आणि स्थानिक चौकशी आधारे निश्चित करण्यात आले आहेत.

**9. संपादित होणाऱ्या जमिनीचे बाजारमूल्य :-**

मागील तीन वर्षाचे खरेदी विक्री व्यवहार व शिघ्रसिद्ध गणकाचे दर विचारात घेण्यात आले कलम 3(D) अधिसूचने नुसार मौजे भवानीनगर ता. वाळवा जि.सांगली येथील खाली दर्शविल्या प्रमाणे जमीन संपादित होत आहे. मौजे भवानीनगर ता. वाळवा येथील ग्रामीण क्षेत्रातील हायवे वरील सन्मुख जमीनीकरीता त्यास असलेली बिनशेती संभाव्यता विचारात घेवुन नियमानुसार हायवे वरील 1250/- मुल्य निश्चित करण्यात येत आहे. त्याची परिगणना खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

**प्रपत्र - 6**

| अ.क्र. | खातेदाराचे नाव | गट/ सर्व्हे क्र. | संपादित जमीनीचा ग्रुप क्रमांक | सदरच्या निवाडयामध्ये समाविष्ट करण्यात आलेले क्षेत्र चौ.मी. (3 डी प्रमाणे) | सदरच्या निवाडयामध्ये समाविष्ट करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) (संयुक्त् मोजणीतील क्षेत्र ) | कलम 26 प्रमाणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मुळ बाजार मुल्य प्रति चौ.मी. | मुळ बाजार मुल्याप्रमाणे जमिनीचे मुल्य प्रति चौ.मी. | गुणक | गुणाक 2.00 नुसार येणारे मुल्य |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1. बाबासो भिमराव पाटील<br>२. हेमंतकुमार भिमराव पाटील | 184 पै | 5 | **0.0090** | **0.0081** | 1250 | 101250 | 2 | 202500 |
| 2 | १.विनोद रामराव पाटील<br>२.सुभाष रामराव पाटील<br>३.सुरेश रामराव पाटील | 185 पै | 4 | **0.0080** | **0.0072** | 1250 | 90000 | 2 | 180000 |
| 3 | १.शामराव पांडुरंग पाटील | 183 पै | 5 | **0.0250** | **0.0225** | 1250 | 281250 | 2 | 562500 |
| 4 | १.दिलीप तातोबा मदने<br>२.जगन्नाथ तातोबा मदने<br>३.रुपेश शामराव देसाई | 182 पै | 6 | **0.0050** | **0.0045** | 1250 | 56250 | 2 | 112500 |
| 5 | १.गणपती कृष्णा पाटील | 205 पै | 6 | **0.0030** | **0.0027** | 1250 | 33750 | 2 | 67500 |
| 6 | १.सुभाष मारुती गोडसे | 216 पै | 5 | **0.0030** | **0.0027** | 1250 | 33750 | 2 | 67500 |

**10. विच्छेद आणि हानिकारक परिणाम यासाठी नुकसान भरपाई**

अशी बाब प्रस्तुत निवाड्यात नाही.

**11.(अ) इनाम जमीन**

मौजे भवानीनगर येथील संपादनाखालील जमीनीपैकी कोणतीही जमीन इतर वतनी इनाम जमीन नाही.

**11.(ब) नविन अविभाज्य शर्त**

मौजे भवानीनगर येथील संपादनाखलील जमीनीपैकी जमीन नविन शर्तीची नाही.

**12. जमीन मालक व कुळामध्ये मावेजाचे संविभाजन**

निरंक

**13. जमिनीतील स्थावर व त्यावर आधारित मालमत्तेचे मुल्यांकनाबाबत**

भूसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 29 नुसार संयुक्त मोजणी अहवालानूसार संपादित होणाऱ्या जमिनीतील मालमत्तेचे मुल्यांकन करणेसाठी सर्व संबंधित विभागास मोजणी अहवालाची प्रत देवुन मुल्यांकन अहवाल मागविणेत आले होते. त्याबाबतचा मुल्यांकन अहवाल त्यांनी सादर केला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

**14. विधंन विहीर, विहीर व पाईपलाईनचे मुल्यांकन**

संयुक्त मोजणी नकाशामध्ये विधंन विहीरी, विहीर व पाईपलाईनच्या दिसून येत नाही. त्यामुळे मुल्यांकनाचा प्रश्न उद्भवत नाही.

**15. बांधकामाचे मूल्यांकन :**

संयुक्त मोजणी नकाशामध्ये बांधकाम दिसून येत नाही. त्यामुळे मुल्यांकनाचा प्रश्न उद्भवत नाही.

**16. वन झाडांचे मूल्यांकन अहवाल :-**

संयुक्त मोजणी नकाशामध्ये वन झाडे दिसून येत नाही. त्यामुळे मुल्यांकनाचा प्रश्न उद्भवत नाही.

**17. फळ झाडांचे मूल्यांकन अहवालः**

संयुक्त मोजणी नकाशामध्ये फळ झाडे दिसून येत नाही. त्यामुळे मुल्यांकनाचा प्रश्न उद्भवत नाही.

**18. दिलासा रक्कम :-**

भूसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 30 (1) प्रमाणे संपादित जमिनीच्या भरपाई रकमेच्या (जमिनीशी जोडलेल्या सर्व घटकांच्या मूल्यांकनासह) एकूण नुकसान भरपाई रकमेवर 100 टक्के दिलासा रक्कम भरपाई म्हणून देण्यात येत आहे.

**19. 12% अतिरिक्त घटकाची रक्कमः-**

भूसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 30 (3) नुसार प्रस्तुत प्रकरणी कलम 3 (A) ची अधिसूचना भारतीय राजपत्र असाधारण भाग II खंड 3, उपखंड (ii) अधिसूचना क्र.588 का.आ./657(अ) दिनांक- 28/02/2017 रोजी प्रसिध्द झाली असून त्या दिनांकापासून म्हणजेच (28/02/2017 ते 27/08/2018 (545 दिवस)) निवाडा दिनांकापर्यंतचा कालावधी लक्षात घेवून 12% अतिरिक्त रक्कमेची परिगणना करताना कलम 26 (1) नुसार येणाऱ्या जमिनीच्या किमतीत कलम 26 (2) नुसार परिगणीत केले आहे.

**20. आस्थापना खर्च व इतर सेवा सुविधा खर्च :-**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम1956 अंतर्गतच्या प्रकल्पासाठी शासनाचे महसूल व वन विभाग कडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-01/2018/प्र.क्र.11/अ-2 दि.04.04.2018 अन्वये 1.50 टक्के इतकी रक्कम आस्थापना खर्च शासनास वनि वाडयाच्या रक्कमेच्या एकूण 1.0 टक्के सोयीसुविधा शुल्क सक्षम प्राधिकारी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाळवा यांचे स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये जमा करणेत यावी असे शासनाने आदेश दिलेले आहेत.

**21. मालकी हक्क :**

संपादित होणाऱ्या जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी संबंधित जमिनीच्या अधिकार अभिलेखातील नोंदी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. मालकी हक्क व नुकसान भरपाई बाबत हरकती निर्माण झाल्यावर त्यावर राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 चे कलम 3 (H) 4 नुसार कारवाई करण्यात येईल. संबंधित व्यक्तीने अथवा खातेदाराने भूसंपादन मावेजा स्वीकारल्यावर कालांतराने

कोणत्याही सक्षम न्यायालयाद्वारे त्यांच्या संपादित होत असणाऱ्या मिळकतीतील हिस्स्याबाबत निर्णय होवून अधिकार अभिलेख नोंद असणाऱ्या किंवा नसणाऱ्या व्यक्तीचा संपादित क्षेत्रातील काही हिस्स्यापूरता किंवा पूर्ण हिस्स्याबद्दल हितसंबंध निर्माण केला असेल तर मोबदला स्विकारणारी व्यक्ती ही नव्याने हितसंबंध निर्माण झालेल्या व्यक्तीला त्या हितसंबंधापूरता मोबदल्याचा हिस्सा हस्तांतरीत करणे करीता पूर्णतः कायदेशीर जबाबदार राहील. म्हणजेच संपादित मिळकतीच्या मालकीबाबत संपादनापूर्वी अथवा संपादनानंतर देखील वाद निर्माण झाला असेल तर निवाडा घोषीत झाल्यानंतर निर्माण झालेला अथवा होणारा वाद हा संपादित क्षेत्राच्या मालकीबद्दल न राहता संपादित क्षेत्राच्या मोबदल्यापुरता मर्यादित राहील. म्हणजेच भूसंपादनानंतर संपादित होणारी जमीन निर्धोकपणे शासनाकडे निहीत होईल. ज्या जमिनीचे अधिकार अभिलेखामध्ये बेकायदेशीर खरेदी विक्री व्यवहार, शर्त भंग, तुकडेबंदी तुकडेजोड विरुध्द झालेले व्यवहार, संपादित जमिनीचे अभिलेख (7/12) चे कब्जेदार सदरी अथवा इतर हक्क सदरी नोंद असलेल्या बँका, पतसंस्था, सोसायटी इ. वित्तीय संस्था चे बोजे व इतर सर्व प्रकारचे शासकीय वसूलीबाबतचे बोजे तसेच इकरार यांचे उत्तरदायित्व संपादित होणा-या जमिनीचे संबंधित धारक यांचेवर राहिल. तसेच अशा नोंदी असलेल्या जमिनीची नुकसान भरपाई अदा करण्यापूर्वी सक्षम अधिकारी यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र अथवा अशा नोंदी बाबतचा योग्य तो आदेश प्राप्त करुन घेण्यात येईल. नवीन शर्तीच्या जमीन नुकसान भरपाईमधुन शासनाच्या प्रचलित एकूण मोबदल्याच्या 10% नियमाप्रमाणे नजराना रक्कम वसुल करून शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. व उर्वरित रकमेचे संबंधितास वाटप करण्यात येईल. गावठाणातील घराच्या जागेच्या मालकी हक्काबाबत पुरावे दिल्यानंतर संबंधितास मोबदला वाटप करण्यात येईल. ज्या गटामधून जमीन संपादन होत आहे त्या गटाच्या 7/12 उताऱ्यावरील सर्व हितसंबंधीची नावे निवाड्यात समाविष्ट केलेली आहेत. नुकसान भरपाई वाटपाच्या वेळी संबंधित खातेदारांनी योग्य ते पुरावे सादर केल्यास व 7/12 ला कब्जेदार असलेले अन्य हिस्सेदारांनी सक्षम स्थळ पाहणी अधिकारी यांच्या समोर उपस्थित राहून लिहून दिलेल्या संमतीवजा जवाब नुसार प्रत्यक्षात ज्या खातेदाराची जमीन ताबे वहिवाटा प्रमाणे संपादित होत आहे. त्यांनाच नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यात येईल. तसेच 7/12 उताऱ्यावर खातेदाराचे नावे आनेवारीने दाखल झालेली असल्यास प्रत्येकाच्या हिस्स्याप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यात येईल. मात्र आणेवारी प्रमाणे प्रत्यक्षात ज्या खातेदाराची जमीन ताबेवहिवाटी प्रमाणे (आनेवारी प्रमाणे हिस्स्याचे क्षेत्र) रुंदीकरणासाठी संपादीत होत आहे. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य हिस्सेदार (ज्याच्या हिस्स्याचे क्षेत्र संपादित होत नाहीत) यांनी सक्षम स्थळ पाहणी अधिकारी यांच्यासमोर लिहून दिलेल्या संमतीवजा जवाबानुसार ज्यांची जमीन प्रत्यक्ष संपादित होत आहे त्यांनाच नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यात येईल त्यांच्या खात्यावरुन संपादित जमिनीचे क्षेत्र केंद्र शासनाकडे वर्ग करण्यात येईल. 7/12 वरील अन्य हितसंबंधीत खातेदार ज्यांची जमीन ताबेवहिवाटी प्रमाणे प्रत्यक्षात रुंदीकरणासाठी जात नसेल त्यांना नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे भूसंपादनाचा कोणताही पुरावा न देता अथवा लेखन प्रमादाने अगर नजरचुकीने मावेजाची रक्कम संबंधीत शेतक-यास अथवा इसमास प्रदान झाल्यास अथवा भूधारकास ज्यादा अतिरीक्त रक्कम प्रदान झाल्यास ती

रक्कम महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार महसुल थकबाकी म्हणुन वसुल करण्यास पात्र राहील.

**22. नुकसान भरपाई रकमेचा तपशील :-**

**कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोल्हापूर यांचेकडील जा.क्र.367/2023 दिनांक 22.02.2023 अन्वये मौजे भवानीनगर येथील तासगाव राष्ट्रीय क्र.266 (कि.मी.13/200 ते 25/200 ) अन्वये सदर निवाडयामध्ये त्रुटी काढणेत आलेल्या आहेत त्याअनुषंगाने खालील प्रमाणे त्रुटी पुर्तता केलेली आहे.तसेच सदर निवाडयामधील अंतिम तक्त्यातील रकाना 19 मध्ये व्याज आकारणीचा कालावधी 18.02.2019 ते 05.07.2023 अखेर धरणेत येत आहे.**

भूसंपादन पुनर्वसन, व पुनर्स्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 27 व 28 प्रमाणे मोबदला रकमेची निश्चिती करतांना यापुर्वी कलम 26 (1) या प्रमाणे निश्चिती करण्यात आलेले जमिनीचे बाजारमुल्य, दर संपादनात असणारी बांधकामे, फळझाडे इ. बाबी मूल्यांकन अंतर्भूत करणे आवश्यक आहे. या सर्व बाबीचा विचार करून मोबदला रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**प्रपत्र - 7**

| अ.नं. | संपादित जमिनीचा तपशील | क्षेत्र |
|---|---|---|
| 1 | कलम 3(D) नुसार राजपत्रात प्रसिध्द झाले क्षेत्र | 477 चौ.मी |
| 2 | शासकीय जमीनीचे क्षेत्र | निरंक |
| 3 | निवाड्यासाठी विचारात घेतलेले जमिनीचे दर रु./प्रति चौ.मी | 1250 चौ.मी |
| 4 | जमिनीचे बाजारमुल्य | 596250 |
| 5 | जमिनीचे गुणांकाधारित बाजारमुल्य (2.00 गुणांकाप्रमाणे) | 1192500 |
| 6 | संपादनात समाविष्ट इतर बाबीचे मुल्यांकन (Assets Value) | |
| | अ) बांधकामाचे मूल्यांकन | 0 |
| | ब) फळझाडांचे मूल्यांकन | 0 |
| | क) विहीर,विधन विहीर,पाईपलाईन, पाण्याची टाकी मुल्यांकन | 0 |
| | ड) वन झाडांचे मुल्यांकन | 0 |
| 7 | इतर मालमत्ता एकुण मूल्याकंन | 0 |
| 8 | एकुण जमीन व इतर मोबदला 5+7 | 1192500 |
| 9 | 100 टक्के दिलासा रक्कम | 1192500 |

| | | |
|---|---|---|
| 10 | जमिनीच्या गुणकाआधारे आलेल्या मुल्यांकनावर (अ.क्र.4)12 टक्के अतिरीक्त घटकाची रक्कम (दि.18.02.2019 ते 05.07.2023 पर्यंत ( 1599 दिवस) | 313448 |
| 11 | एकुण देय मोबदला रक्कम (8+9+10) | 2698448 |
| 12 | 1.5 टक्के आस्थापना शुल्क | 40477 |
| 13 | 1.0 टक्के सोई सुविधा शुल्क | 26984 |
| 14 | एकुण निवाडा रक्कम (11+12+13) | 2765909 |

**23. मोबदला वाटप प्रक्रिया :**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 3 (H) मधील तरतुदीप्रमाणे निवाडा रक्कम केंद्रशासना द्वारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करावी. याप्रमाणे निवाडा रक्कम सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा केल्यावर उक्त अधिनियमाच्या कलम 3 (H) (2) अन्वये सक्षम प्राधिकारी केंद्रशासनाच्या वतीने या निवाड्याद्वारे संपादित करण्यात आलेल्या क्षेत्रातील पात्र हितसंबंधित व्यक्तींना त्याच्या क्षेत्र व हिश्श्यानुसार रकमेचे वाटप करतील व त्यांचेकडून संपादित क्षेत्राचा ताबा घेतील. भूसंपादन मोबदला रक्कम वाटप करताना संपादित होणाऱ्या क्षेत्राच्या मालकीबद्दल अथवा मोबदला रकमेतील हिश्श्याबद्दल वाद निर्माण झाल्यास प्रमुख जिल्हा न्यायालय यांच्या न्यायालयात (The principal civil court of original jurisdiction within the limits of whose jurisdiction the land is situated) यांचेकडे उक्त अधिनियमाच्या कलम 3 (H) (4) नुसार त्यांचे निर्णयासाठी मोबदला रक्कम जमा करतील.

**24. जमिनीचा ताबा :**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियमाच्या 3 ई (1) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी संपादित जमिनीच्या हितसंबंधितास हा निवाडा घोषित केल्यावर मोबदला रक्कम स्विकारणेसाठी व त्याचवेळी संपादित मिळकतीचा ताबा केंद्रशासनास हस्तांतरीत करणेकरिता लेखी नोटीसीद्वारे कळवतील. अशा नोटीसीची बजावणी झाल्यावर 60 दिवसाच्या कालावधीत जर हितसंबंधित व्यक्तिंनी ताबा हस्तांतर केला नाही तर उक्त अधिनियमाच्या कलम 3 ई (2) प्रमाणे जिल्हाधिकारी यांना ताबा प्राप्त करणेकरिता सक्षम प्राधिकारी विनंती करतील. व जिल्हाधिकारी यांचे मार्फत सक्षम प्राधिकारी यांना अथवा त्यांचेद्वारे प्राधिकृत व्यक्तीस ताबा हस्तांतरीत केला जाईल.

**25. जमिनीचा वापर :**

संपादन करण्यात आलेली जमीन ही राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात आलेली आहे. या संपादनाखालील ज्या जमिनींना वनसंबंधित कायदयाच्या तरतुदी लागु आहेत अथवा इतर कायदयाच्या किंवा न्यायालयाच्या आदेशाद्वारे वापरातील बदलास निर्बंध लागू आहेत. या बाबतीत भूसंपादनानंतर अनुज्ञेय वापर सुरु करण्यापूर्वी वनविभाग अथवा त्या-त्या परिस्थितीतील निर्बंध असणाऱ्या विभागातील सक्षम स्तरावरुन वापरातील

निर्बंधाबाबत परवानगी घेवूनच संपादित करण्यात आलेल्या अशा मिळकती ह्या ज्या प्रयोजनासाठी संपादित केल्या आहेत त्या प्रयोजनासाठी वापर करण्यास पात्र ठरतील. अशा प्रकरणांमध्ये सक्षम स्तरावरुन अनुज्ञेय वापरात बदल करुन घेण्याची जबाबदारी संपुर्णतः संपादन संस्था म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांची राहील म्हणजेच या भूसंपादन प्रक्रियेद्वारे संपादित जमिनींची केवळ मालकी (Title) संपादन संस्थेकडे कायदेशीरपणे हस्तांतरीत केली जाते. व त्याच्या वापरादरम्यान वनसंवर्धन कायदयाच्या तरतुदींचा भंग होणार नाही यांची जबाबदारी संपादन संस्थेची राहील.

**26. विश्लेषण :**

**या कार्यालयाकडील पत्र क्र.भूसं/वशी/ 207 /2023दिनांक 10/01/2023 अन्वये मौजे भवानीनगर ता.वाळवा येथील कराड-तासगाव राष्ट्रीय महामार्ग क्र.266 चा अंतिम निवाडा त्रुटीपुर्तता करुन कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग कोल्हापूर यांचेकडे सादर करणेत आलेला होता.त्याअनुषंगाने त्यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.प्रशा/367/2023 दिनांक 24.02.2023 अन्वये सदर निवाडयामध्ये अंतीम मुल्यांकन तक्त्यामध्ये गट नंबर 184पै,185पै,183पै,182पै,205पै,216पै,मध्ये क्षेत्रामध्ये नजरचुकीने तफावत झालेली आहे व कमी क्षेत्राचा निवाडा जाहिर करण्यात आला आहे.त्यामुळे मौजे भवानीनगर ता.वाळवा येथील कराड-तासगाव राष्ट्रीय महामार्ग क्र.266 चे गट नंबर 184पै,185पै,183पै,182पै,205पै,216पै,इत्यादी गटांचा फेर सुधारित अंतिम निवाडा करणेत आलेला आहे.**

वरील परिच्छेद क्रं. 2 मध्ये मौजे भवानीनगर ता. वाळवा जि. सांगली येथील संपादनाचे क्षेत्र व त्या अनुषंगाने कायदयातील तरतुदी विचारात घेता परिगणित करण्यात आलेली जमीन व तिच्याशी निगडीत बांधकामे, झाडे व पाणी पुरवठा साधने यांच्या मोबदल्याचा एकत्रित सारांश दर्शविण्यात आलेला आहे. तसेच या निवाड्यासोबत जोडलेल्या निवाडा पत्रकामध्ये संपादित होणाऱ्या सर्व नंबर / गट नंबर निहाय विस्तृतपणे अनुज्ञेय मोबदल्याचा तपशील विषद करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या कलम 3 (G) (1) प्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणून केंद्रशासनाने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त अधिनियमाच्या कलम 3 (D) नुसार मौजे भवानीनगर ता. वाळवा जि. सांगली येथील संपादित करण्यात आलेल्या मिळकतींचा निवाडा या आदेशाद्वारे घोषित झाला आहे असे जाहिर करण्यात येत आहे.

ज्याअर्थी हा निवाडा घोषित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम 3 (ई) व 3 (H) प्रमाणे सर्व हितसंबंधितांस नोटीसा देण्यात येतील.

ज्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या कलम 3 (G) प्रमाणे हा निवाडा जाहीर झाला असून अंतिमतः संपादित जमिनीवरील सर्व हितसंबंधी यांचे / खातेदारांचे सर्व हक्क संपुष्टात येवून ही मिळकत त्या मिळकतीवर असलेल्या सर्व झाडे, बांधकामे व पाणीपुरवठा साधने व इतर मालमत्तांसह तसेच संपुर्ण बोजा विरहित व भारमुक्त (free from all encumbrances) होऊन केंद्र शासनाच्या रस्ते व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या नावे फेरफार घेवून करण्यात यावी.

तसेच ज्या अर्थी या निवाड्याद्वारे संपादित जमीन ही सर्व भारमुक्त होऊन केंद्र शासनाचे वरील मंत्रालयाचे नावे विहित करण्यात आली आहे. त्याअर्थी सदर जमिनींच्या आज रोजीपर्यंत

अनुज्ञेय असलेल्या सर्व प्रकारचा जमीन महसुल कमी करणेची कार्यवाही करण्याचा म्हणजेच सारा माफीचा आदेश देखील याद्वारे देण्यात येत आहे.

1. मी श्रीनिवास अर्जुन, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाळवा याद्वारे मौजे- भवानीनगर ता. वाळवा येथील अंतिम निवाडा जाहीर करत असुन अंतिम निवाडा स्वरुप खालीलप्रमाणे आहे.
2. मौजे भवानीनगर ता. वाळवा जि. सांगली येथील राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, 1956 चे कलम 3 (D) अंतर्गत अधिसूचित एकुण 477 चौ.मी एवढे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम 3 (G) नुसार निर्धारित करण्यात आलेल्या रक्कम रुपये 2698448/- एवढ्या मोबदल्याच्या विनियमात अंतिमतः संपादित करण्यात आले आहे.
3. सर्व खातेदारांस/हितसंबंधित्यांस उक्त अधिनियमाच्या कलम 3 (ई) व 3 (H) नुसार लेखी नोटीसा देवून याबाबत कळविण्यात यावे.
4. निवाड्याच्या रक्कमेच्या एकूण 1.5 टक्के आस्थापना रक्कम रुपये 40477/-शुल्क सक्षम प्राधिकारी यांनी शासनास जमा करावे.
5. निवाड्याच्या रक्कमेच्या एकूण 1.0 टक्के सोईसुविधा शुल्क रक्कम रुपये 26984/-होत आहे. सदर रकमेतुन प्रकल्प संचालक, राष्ट्रीय राजमार्ग क्र. 266 यांनी अग्रीम स्वरुपात दिलेली रक्कम कपात करून घेवून उर्वरित रक्कम उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाळवा यांचे स्वीय प्रपंजी खात्यात जमा करणे अपेक्षित आहे.

या निवाड्याद्वारे घोषित क्षेत्राच्या अधिकार अभिलेखात भोगवटादार सदरी संपादन संस्था म्हणजे रस्ते व परिवहन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे नावे संपादित क्षेत्रापुरते दाखल करण्यात यावे.

ठिकाण : वाळवा
दिनांक : 05/07/2023

(श्रीनिवास अर्जुन )
उपविभागिय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी वाळवा

## अंतिम निवाडा पत्रक

संचिका क्रमांक-भूसं./एसआर/ 22 / 2018 गाव- भवानीनगर तालुका-वाळवा जिल्हा- सांगली

प्रकल्पाचे नाव - भूसंपादन राष्ट्रीय महामार्ग क्रं.266 कराड तासगाव कि.मी.13/200 ते कि.मी.25/550 रस्ता चौपदरीकरण

निवाडा जाहीर झाल्याचा दिनांक- 05/07/2023

| अ.क्र. | खातेदाराचे नाव | गट/ सर्व्हे क्र. | संपादित जमीनीचा ग्रुप क्रमांक | सदरच्या निवाडया मध्ये समाविष्ट करण्यात आलेले क्षेत्र चौ.मी. (3 डी प्रमाणे) | सदरच्या निवाडयामध्ये समाविष्ट करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | कलम 26 प्रमाणे | | | | कलम 29 प्रमाणे जमिनीच्या संलग्न बाबींच्या किमती | | | | | संपादीत जमीनीच्या संलग्न बाबींच्या मुल्यांकनाची एकुण रक्कम (11 ते 15) | मुल्यांकनाची एकुण रक्कम (10 + 16) | कलम 30(1) प्रमाणे दिलासा रक्कम 100% | 12% प्रमाणे अतिरिक्त घटक दि. 18.02.2019 ते 05.07.2023 (1599 दिवस ) | एकुण देय मोबदला रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मुळ बाजार मुल्य प्रति चौ.मी. | मुळ बाजार मुल्याप्रमाणे जमिनीचे मुल्य प्रति चौ.मी. | गुणक | गुणाक 2.00 नुसार येणारे मुल्य | विंधन विहिर | विहीरी/ पाईप लाईन/ पाण्याची टाकी | बांध कामे | वन झाडे | फळ झाडे | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 1 | 1. बाबासो भिमराव पाटील<br>२. हेमंतकुमार भिमराव पाटील | 184 पै | V | 0.0081 | 81 | 1250 | 101250 | 2 | 202500 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 202500 | 202500 | 53227 | 458227 |
| 2 | १.विनोद रामराव पाटील<br>२.सुभाष रामराव पाटील<br>३.सुरेश रामराव पाटील | 185 पै | IV | 0.0072 | 72 | 1250 | 90000 | 2 | 180000 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 180000 | 180000 | 47313 | 407313 |
| 3 | १.शामराव पाडुरंग पाटील | 183 पै | V | 0.0225 | 225 | 1250 | 281250 | 2 | 562500 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 562500 | 562500 | 147853 | 1272853 |
| 4 | १.दिलीप तातोबा मदने<br>२.जगन्नाथ तातोबा मदने<br>३.रुपेश शामराव देसाई | 182 पै | VI | 0.0045 | 45 | 1250 | 56250 | 2 | 112500 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 112500 | 112500 | 29571 | 254571 |
| 5 | १.गणपती कृष्णा पाटील | 205 पै | VI | 0.0027 | 27 | 1250 | 33750 | 2 | 67500 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 67500 | 67500 | 17742 | 152742 |
| 6 | १.सुभाष मारुती गोडसे | 216 पै | V | 0.0027 | 27 | 1250 | 33750 | 2 | 67500 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 67500 | 67500 | 17742 | 152742 |
| | एकुण एकंदर | | | | 477 | 7500 | 596250 | 12 | 1192500 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1192500 | 1192500 | 313448 | 2698448 |

| | |
|---|---|
| 1.5 टक्के आस्थापना शुल्क | 40477 |
| 1.0 टक्के सोईसुविधा शुल्क | 26984 |
| एकुण | 2765909 |

ठिकाण इस्लामपूर
दिनांक 05 /07/2023

अक्षरी रक्कम रुपये सत्तावीस लाख पासष्ट हजार नऊशे नऊ. मात्र

श्रीनिवास अर्जुन
उपविभागिय अधिकारी वाळवा तथा
भूसंपादन अधिकारी वाळवा

627

| दिवस मौजे भवनीनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिने | 18-02-2019 | 2020 | 2020 | 2022 | 2023 |
| जानेवारी | 0 | 31 | 31 | 31 | 31 |
| फेबुरवारी | 12 | 28 | 28 | 28 | 28 |
| मार्च | 31 | 31 | 31 | 31 | 31 |
| एप्रिल | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| मे | 31 | 31 | 31 | 31 | 31 |
| जून | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| जुलै | 31 | 31 | 31 | 31 | 5 |
| ऑगस्ट | 31 | 31 | 31 | 31 | 0 |
| स्प्टेबंर | 30 | 30 | 30 | 30 | 0 |
| ऑक्टोबंर | 31 | 31 | 31 | 31 | 0 |
| नोव्होबंर | 30 | 30 | 30 | 30 | 0 |
| डिसेबंर | 31 | 31 | 31 | 31 | 0 |
| एकुण | 318 | 365 | 365 | 365 | 186 |
| | | | | | 1599 |